नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : ३०४ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार दि. १९ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## मुंबई ते अयोध्या ११ जनरल डब्यांसह अमृत भारत एक्स्प्रेस

**दिवाळी आणि छट पुजेनिमित्त मुंबई ते अयोध्या कँटदरम्यान, साप्ताहिक एक्स्प्रेस चालवली जाणार आहे. या विशेष गाडीचं कसं असेल संपूर्ण वेळापत्रक**

मुंबई (समर्थ गांवकरी)

दिवाळी आणि छठ पूजा या सणानिमित्त मुंबईहून उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर प्रवासी जात असतात. दरवर्षीची प्रवाशांची संख्या लक्षात घेता मध्य रेल्वेने मुंबईहून अयोध्येकरिता विशेष एक्स्प्रेस गाड्यांची घोषणा केली आहे. या विशेष एक्स्प्रेसमुळे उत्तर भारतातील प्रवाशांसह महाराष्ट्रातील प्रवाशांनाही सणासुदीनिमित्त गावी जाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबई ते अयोध्या मार्गावर 'अमृत भारत' एक्स्प्रेस चालवली जाणार आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई मंडळाकडून या अमृत भारत एक्स्प्रेसच्या २४ साप्ताहिक विशेष गाड्या चालवणार आहे. यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवास करता येणार आहे.

लोकमान्य टिळक टर्मिनस- अयोध्या कँट- लोकमान्य टिळक टर्मिनस सुपरफास्ट विशेष गाडी आठवड्यातून दोन दिवस चालवली जाणार आहे. गाडी क्रमांक ०१०४५ ही विशेष गाडी दर सोमवारी आणि शुक्रवारी या दोन दिवसांदरम्यान १९ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत ही एक्स्प्रेस लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकावरून सकाळी ०७.३५ वाजता सुटेल आणि अयोध्या कँट स्थानकावर दुसऱ्या दिवशी सकाळी १०.१५ वाजता पोहोचेल. ह्या कालावधीमध्ये गाडीचे एकूण १२ फेऱ्या होणार आहेत. तर, गाडी क्रमांक ०१०४६ ही साप्ताहिक विशेष गाडी दर मंगळवारी आणि शनिवारी या दोन दिवसांदरम्यान, २० ऑक्टोबर ते २८ नोव्हेंबर या कालावधीत ही एक्स्प्रेस अयोध्या कँट स्थानकावरून दुपारी ०१.५० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकावर सायंकाळी ०५.१५ वाजता पोहोचेल. ह्या कालावधीमध्ये गाडीचे सुद्धा १२ फेऱ्या होणार आहेत. दरम्यान, ह्या एक्स्प्रेसचा ठाणे, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपुर, कटनी, सतना, माणिकपूर, प्रयागराज जंक्शन, प्रतापगड आणि सुल्तानपुर या स्थानकांवर थांबा असेल. विशेष गाडीला अमृत भारत रेक जोडण्यात येणार असून त्यामध्ये आठ स्लीपर क्लास, ११ जनरल



सेकंड क्लास, एक पॅन्ट्री कार आणि दोन सेकंड क्लास कम गार्ड ब्रेक व्हॅन असतील. सणासुदीच्या काळात वाढणारी प्रवासी गर्दी लक्षात घेऊन ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या विशेष एक्स्प्रेसमुळे नाशिक रोड, मनमाड आणि भुसावळ इथे जाणाऱ्या नोकरदारांना सुद्धा दिलासा मिळाला आहे. या परिसरातील प्रवासी सुद्धा अगदी सहजरित्या प्रवास करू शकणार आहेत.

## छत्रपती संभाजीनगर, पुण्यातही एफडीए ची धडक कारवाई

### रिलायन्स स्टोरेज आणि ब्लिंकिटच्या कोल्ड स्टोरेजवर धाड सत्र

**अन्न- औषध प्रशासनाने सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्यामध्ये, 'सेफ फुड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेंतर्गत कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.**

मुंबई (समर्थ गांवकरी)

छत्रपती संभाजीनगर, पुण्यासह इतरत्र जिल्ह्यामध्ये अन्न- औषध प्रशासनाने धडक कारवाई करत लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ऋऊ कडून राज्यामध्ये, 'सेफ फुड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. रिलायन्स स्टोरेज, ब्लिंकिट स्टोरेज, कोल्ड स्टोरेज, विना लेबल साठवलेला अन्न साठा याठिकाणी अन्न- औषध प्रशासनाने कारवाई केली आहे.

पैठण तालुक्यातील कोल्ड स्टोरेजमध्ये नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन केल्यामुळे कारवाई करण्यात आली. उत्पादनांच्या गरजेनुसार आवश्यक असलेले तापमान राखण्यासाठी सक्षम यंत्रणा कार्यरत नव्हती. कोल्ड रूमची कोणतीही देखभाल केली जात नसून, माल पॅलेटवर योग्य पद्धतीने न ठेवता अस्ताव्यस्त साठवलेला होता. परिसरात कीटक नियंत्रणाची कोणतीही अधिकृत उपाययोजना केलेली नव्हती आणि स्वच्छतेचे कोणतेही नियम पाळले जात नव्हते. कारवाईमध्ये तब्बल १ लाख ६५ हजार ८०५ किलोचा ३ कोटी ८९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

गंगापूर तालुक्यातही कारवाई केली. व्यवसाय परिसरात मुख्य व दर्शनी भागात अद्ययावत ऋडज्ञख परवाना प्रदर्शित करण्यात आलेला नव्हता. अन्न साठवणुकीच्या जागेत कमी प्रकाश, तसेच कर्मचाऱ्यांसाठी हात धुण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. शीतगृहातील तापमानाची नोंद ठेवणारी कोणतीही अधिकृत यंत्रणा किंवा तापमान रेकॉर्ड बुक उपलब्ध नव्हती. 'फर्स्ट इन, फर्स्ट आउट' (FIFO) या साठवणूक व विक्रीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत होते. कचरा आणि अन्नकचऱ्याची वेळेवर विल्हेवाट न लावल्यामुळे संपूर्ण परिसरात अस्वच्छता पसरली होती. कारवाईत जप्त करण्यात आलेल्या गूळ, मनुका आणि पाश्चराईज्ड बटर हे तिन्ही ३१,६७५ किलोचा ३० लाख ७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगरातील चाकणमध्ये, रिलायन्स रिटेल शॉपमध्ये, FDA च्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीमध्ये, कालबाह्य आणि खराब झालेल्या अन्न पदार्थांची अंतिम विल्हेवाट किंवा नाश केल्याबाबत समाधानकारक व्यावसायिकाला व्यवस्थित माहिती देता आली नाही. संपूर्ण गोदामात उंदरांची विष्ठा, मुदतबाह्य आणि खराब उत्पादने विलगीकरणाशिवाय एकत्र व काही ठिकाणी विक्रीसाठी प्रदर्शित, फरशीच्या फटींमध्ये झुरळे आणि कर्मचारी दुकानाच्या थुंकत असल्याचे आढळले. विल्हेवाट संस्थेसोबतचा करार सादर केला, मात्र प्रत्यक्ष विल्हेवाटीचे पडताळणीयोग्य पुरावे सादर झाले नाहीत. सहायक आयुक्त (अन्न) तथा पदनिर्दिष्ट अधिकारी, परिमंडळ-०५, पुणे यांनी दि. १५ ऑक्टोबर रोजी, परवाना निलंबित केला.

तर, निघोजेमध्ये ब्लिंकिट कॉमर्सच्या कोल्ड स्टोरेजमध्ये, अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी तपासणी केली. कोल्ड रूमचे तापमान ५८ पेक्षा जास्त व शीतसाखळीचे अभिलेख नसणे, अन्न व अन्न पदार्थ एकत्र, ढरींर डश्रीं (५० किलो),सुजी (६० किलो) थेट जमिनीवर, गळती असलेली पाकिटे, झुरळांचा प्रादुर्भाव तसेच सुमारे ६०० कर्मचाऱ्यांपैकी केवळ ५ कर्मचाऱ्यांची

## पंचायत समिती कल्याण येथे 'जल सुरक्षा अभियान' कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### ८० हून अधिक जल सुरक्षा रक्षक यांचा सहभाग; पाणी गुणवत्ता व जलसुरक्षेबाबत जनजागृतीवर भर

ठाणे (समर्थ गांवकरी)

पाणी गुणवत्ता, जलस्रोतांचे संरक्षण आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने पंचायत समिती कल्याण येथे 'जल सुरक्षा अभियान' अंतर्गत दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्वच्छ भारत मिशन पंडित राठोड यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. INREM$^2$ Foundation यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत आयोजित कार्यशाळेला ८० हून अधिक सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हा परिषद,ठाणे स्वच्छ भारत मिशन व INREM$^2$ Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेस जिल्हा परिषद ठाणेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक पंडित राठोड, INREM$^2$ Foundation चे कार्यकारी संचालक डॉ. सुंदरराजन कृष्णन, पंचायत समिती कल्याणचे गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रारूपकार महेश वाळुंज, जिल्हा परिषद ठाणेच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ सुजाता पाटील, आरोग्य विभागाचे आरोग्य सहाय्यक रमेश सांबरे तसेच UNICEF चे राज्य WASH सल्लागार संदीप तेंडोलकर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील जलक्षेत्रात कार्यरत WOTR, CW-DM$^2$, UNICEF आणि SATTVAया विकास भागीदार संस्थांचे प्रतिनिधी तसेच जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनचे जिल्हास्तरीय अधिकारी, जिल्हा परिषद ठाणेचे अधिकारी-कर्मचारी आणि पंचायत समिती कल्याण स्तरावरील अधिकारी यांचीही कार्यशाळेत सक्रिय उपस्थिती होती.

कार्यशाळेचे नेतृत्व INREM$^2$ Foundationच्या Programme Lead नेहा पवार यांनी केले, तर INREM$^2$ Foundationच्या Consultant नम्रता गोडांबे यांनी कार्यक्रमाचे समन्वय व




सूत्रसंचालन केले. INREM$^2$ FoundationÀ`m मध्य प्रदेश व गुजरात येथील पथकातील सदस्यांनीही कार्यशाळेत सहभागी होऊन विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत 'जल सुरक्षा अभियान'ची संकल्पना, उद्दिष्टे आणि कार्यपद्धती याबाबत माहिती देण्यात आली. तसेच लच्यिा जलक्षेत्रातील उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. ठाणे जिल्हा परिषद व WSSOच्या अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील स्थानिक जलसमस्या, पाणी गुणवत्ता, जलस्रोतांचे संरक्षण आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी विविध गावांमध्ये जलसुरक्षा विषयावर काम करणाऱ्या 'जल सुरक्षाकां'नी त्यांच्या गावांतील पाणी गुणवत्ता व जलस्रोतांशी संबंधित अनुभव सहभागींसमोर मांडले. स्थानिक पातळीवरील पाणीविषयक समस्या, त्यावरील उपाययोजना आणि जलसुरक्षेसाठी समुदायाच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व यावर चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेच्या समारोपावेळी 'जल सुरक्षा अभियान'च्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदणी करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. उपस्थित सहभागींची अभियानाच्या पुढील उपक्रमांसाठी नोंदणी व ऑनबोर्डिंग करण्यात आले.

पाणी गुणवत्ता सुधारणा, जलस्रोतांचे संरक्षण, स्थानिक जलसमस्यांवरील उपाययोजना आणि समुदायाचा सक्रिय सहभाग यांना चालना देणाऱ्या या कार्यशाळेमुळे ठाणे जिल्ह्यात जलसुरक्षेबाबतच्या सामूहिक प्रयत्नांना अधिक बळ मिळणार आहे.









श्री साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची अढळ श्रद्धा असून, भाविक भक्तिभावाने श्री साईबाबांच्या चरणी विविध प्रकारच्या वस्तू व देणगी अर्पण करत असतात. याच श्रद्धा आणि भक्तिभावातून कोइंबतूर, तामिळनाडू येथील साईभक्त श्रीमुरली रंगनाथन यांनी श्री साईबाबांच्या चरणी ८० ग्रॅम वजनाचे शुद्ध सोन्याचे कडे भक्तिभावाने अर्पण केले. या सुवर्ण कड्याचे देणगी मूल्य रु. १० लाख ९३ हजार ७६० इतके आहे. यावेळी श्री साईबाबा संस्थानच्या वतीने प्रशासकीय अधिकारी श्री. अविनाश कुलकर्णी यांनी देणगीदार साईभक्त श्री. मुरली रंगनाथन यांचा सत्कार केला.

# तामसा येथे आज गतिरोधकांसाठी ममता जोशी यांचे उपोषण

**अपघात रोखण्यासाठी गतिरोधक, डिव्हायडर व सुरक्षात्मक उपाययोजनांची मागणी**

**तामसा (समर्थ गांवकरी)**

तामसा शहरातून जाणाऱ्या राज्य महामार्ग क्र. २५१ व राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ (आय) वर वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी आज, रविवार, दि. १९ऑक्टोबर रोजी तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजप महिला मोर्चाच्या हदगाव तालुकाध्यक्ष सौ. ममता अर्जुन जोशी उपोषणाला बसणार आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर गतिरोधक, डिव्हायडर, झेब्रा क्रॉसिंग, वाहतूक सूचना फलक आणि सर्व्हिस रोडसह आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने करण्याची त्यांची प्रमुख मागणी आहे.

तामसा हे परिसरातील महत्त्वाचे बाजारपेठेचे ठिकाण असून, शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. शहराच्या मध्यवर्ती भागात शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, दवाखाने आणि शासकीय कार्यालये असल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व पादचाऱ्यांना मुख्य रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना नसल्याने अपघातांचा धोका कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

निवेदनांनंतरही ठोस कार्यवाही नाही

तामसा शहरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीही संबंधित विभागाकडे निवेदने देऊन गतिरोधक व इतर सुरक्षात्मक उपाययोजनांची मागणी करण्यात आली होती. मात्र, या मागण्यांवर अद्याप ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रस्ते सुरक्षेच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, यासाठी ममता जोशी यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. संबंधित विभागाने निवेदनाची दखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी त्यांची मागणी आहे.

प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

या उपोषणाच्या माध्यमातून तामसा शहरातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, जिल्हाधिकारी नांदेड, तहसीलदार हदगाव, गटविकास अधिकारी, तामसा पोलीस ठाणे तसेच संबंधित बांधकाम विभागाला या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा; अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन सुरूच ठेवू, असा इशारा ममता जोशी यांनी दिला आहे. त्यामुळे आजच्या उपोषणानंतर प्रशासन कोणती भूमिका घेते आणि प्रत्यक्ष कार्यवाही कधी सुरू होते, याकडे तामसा शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.. चोकट महिला उपोषणकर्त्या कडे संबंधित प्रशासन ला गांभीर्यच नाही का. जेव्हा एका महिला रस्त्यावर उतरतो...

# किनवटच्या जंगलात वनखात्याचा बळी? मदनापूर रेल्वे ट्रॅकवर राष्ट्रीय प्राणी वाघाचा संशयास्पद मृत्यू

**राजकीय उदासिनतेमुळे जंगल तस्करांच्या विळख्यात!**

**किनवट (समर्थ गांवकरी)**

मराठवाड्यातील सर्वाधिक घनदाट जंगल, डोंगरदऱ्या आणि निसर्गसंपदा लाभलेल्या नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात आज वनखात्याच्या ढिसाळ कारभाराचा आणि राजकीय अनास्थेचा अत्यंत संतापजनक व धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भारताचा राष्ट्रीय प्राणी असलेल्या वाघाचा मदनापूर परिसरातील रेल्वे रुळावर छिन्नविच्छिन्न अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हा निव्वळ अपघात नसून वाघाची शिकार करून मृतदेह रेल्वे ट्रॅकवर फेकून अपघाताचा बनाव रचल्याचा तीव्र संशय पर्यावरणप्रेमी व स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

मदनापूर रेल्वे ट्रॅकवर नेमकं काय घडलं?

आज सकाळी मदनापूर परिसरातील रेल्वे ट्रॅकवर एका पूर्ण वाढ झालेल्या वाघाचा रक्तबंबाळ आणि विद्रूप अवस्थेतील मृतदेह आढळून आला. वाघाच्या शरीरावरील जखमा आणि स्थिती पाहता घातपाताची दाट शक्यता वर्तवली जात आहे. जंगलात निर्भयपणे वावरणारा जंगलाचा राजा असा रेल्वे ट्रॅकवर मृतावस्थेत सापडल्याने वनखात्याची गस्त आणि सुरक्षा व्यवस्था केवळ कागदावरच आहे का, असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

मंजूर पद असूनही उफ्र्ज ची नियुक्ती का नाही? राजकीय अनास्थेचा फटका!

किनवटच्या संवेदनशील आणि विस्तीर्ण जंगल क्षेत्राच्या रक्षणासाठी आणि सर्वांगीण व्यवस्थापनासाठी येथे उपवनसंरक्षक (DFO) पदाची अत्यंत गरज आहे. शासनाने या पदाला मंजुरी दिली असली, तरी स्थानिक राजकीय कुरघोडी आणि अनास्थेमुळे आजतागायत या पदावर सक्षम अधिकाऱ्याची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आलेली नाही. वनखात्यात वरिष्ठ जबाबदार अधिकारीच नसल्याने स्थानिक पातळीवर वनकर्मचाऱ्यांवर कोणाचाही वचक उरलेला नाही.

ट्री कटींगच्या नावाखाली सागवान तस्करीचा गोरखधंदा

पूर्णवेळ वरिष्ठ अधिकारी नसल्याचा थेट गैरफायदा वनमाफिया आणि काही भ्रष्ट अधिकारी-पदाधिकारी घेत आहेत. झाडांच्या छाटणीच्या (ट्री कटींग/ प्रूनिंग) नावाखाली राखीव वनातील हजारो मौल्यवान सागवान वृक्षांची राजरोसपणे कत्तल केली जात आहे. दररोज जंगलातून लाकडांची अवैध वाहतूक सुरू असून वनसंपदा उद्ध्वस्त केली जात आहे. जंगल उद्ध्वस्त होत असल्याने वन्यजीवांचा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला असून ते मानवी वस्त्या आणि रेल्वे मार्गांकडे धाव घेत आहेत.

शिकार की अपघात? उच्चस्तरीय चौकशीची मागणी

वाघाच्या अशा गूढ मृत्यूमुळे नागरिक आणि वन्यजीवप्रेमींमध्ये प्रचंड संताप उसळला आहे.

वाघाची शिकार करून नखे,



दात किंवा अवयव काढण्याचा प्रयत्न झाला का?

शिकार लपवण्यासाठीच मृतदेह रेल्वे ट्रॅकवर आणून टाकला गेला का?

या सर्व बाबींची तात्काळ निष्पक्ष आणि उच्चस्तरीय फॉरेन्सिक तपासणी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. किनवटच्या जंगलात तात्काळ स्वतंत्र DFO ची नियुक्ती करून सागवान तस्करांवर आणि संशयित शिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

# कथा नवरात्रीच्या : अष्टसिद्धी ,बुद्धिदाती माता सिद्धिदात्री

**प्रस्तावना:**

**प्रिय वाचकांनो, पहिल्या माळेच्या पहिल्या कथापुष्पश्रतुन**

**देवी शैलपुत्री'च्या स्थिरतेपासून सुरू झालेला आपला हा भक्तीचा सुरस प्रवास आज नवव्या माळेला घेऊन पूर्णत्वाकडे जात आहे. गेल्या आठ दिवसांत आपण आदिशक्तीच्या वेगवेगळ्या रूपांच्या रोमांचक कथा, पराक्रम आणि महिमा अनुभवला. वाचकांनी या उपक्रम ला जो उदंड प्रतिसाद दिला, त्याबद्दल सर्वांचे शतशः आभार! आज नवरात्रीच्या अंतिम दिवशी आपण आदिशक्तीच्या नवव्या आणि पूर्णत्वाचे प्रतीक असलेल्या 'माता सिद्धिदात्री' या देवीच्या अलौकिक चरित्राकडे वळत आहोत.**

**देवीचे अलौकिक रूप व वाहन**

माता सिद्धिदात्रीचे स्वरूप अत्यंत सौम्य, तेजस्वी, शांत आणि आनंददायी आहे. देवी कमळाच्या भव्य-दिव्य पुष्पावर विराजमान असून काही ठिकाणी ती सिंहारूढ असल्याचेही मानले जाते.माता सिद्धिदात्री चतुर्भुज (चार हातांची) असून तिच्या हातांत अनुक्रमे शंख, चक्र, गदा आणि कमळपुष्प शोभून दिसते. तिच्या चेहऱ्यावरील मंद स्मितहास्य भक्तांच्या जीवनातील सर्व दुःख, चिंता आणि अंधकार क्षणार्धात दूर करून संपूर्ण आयुष्यात सिद्धी आणि समृद्धीचा प्रकाश पसरवते.

**पौराणिक कथा: '**

पौराणिक कथेनुसार, जेव्हा या ब्रह्मांडाची निर्मिती झाली, तेव्हा भगवान शिवाने संपूर्ण सृष्टीमध्ये शक्ती, ज्ञान आणि सिद्धी प्राप्त करण्यासाठी आदिशक्तीची अत्यंत कठोर तपश्चर्या केली.

भगवान शिवाच्या या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन देवी सिद्धिदात्री प्रकट झाली आणि तिने त्यांना अष्टसिद्धी (आठ प्रकारच्या सिद्धी) आणि नवनिधी (नऊ प्रकारच्या संपत्ती) प्रदान केल्या.

या देवीच्या अथांग कृपेमुळेच भगवान शिवांचे अर्धे शरीर हे देवीच्या रुपात रुपांतरीत झाले, आणी भगवान शिव हे अर्धनारीश्वर म्हणून त्रिभुवनात प्रचलीत झाले,

शास्त्रश्रनुसार या त्रिभुवनात देव दानव गंधर्व,ऋषी मुनी व मानव यातील जे कुणी यश शिखरावर पोचतात त्या सर्वांना यश म्हणजेच सिद्धी देणारी माता म्हणजेच आजच्या नवव्या कथा पुष्पातील सिद्धीदात्री हीच आहे,

उपासना व फलप्राप्ती

सिद्धीदात्री ची पूजा व उपासना केल्यास, अणीमा,महिमा,गरिमा, लघिमा, प्राप्ती,प्राकाम्य,इशित्व, व वशीत्व, या आठही देवींच्या वेगवेगळ्या सिद्धी भाविकाला प्राप्त होतात,

इच्छित फलप्राप्ती

नवमीच्या दिवशी माता सिद्धीदात्री ची पूजा केल्यास जीवनातील सर्व अपूर्ण कामे पूर्णत्वास जाण्यास गती मिळते, देवीचे हे मनमोहक रूप अंधाराचा समूळ नायनाट करून भक्ताला ज्ञान, बुद्धी,व मोक्ष प्रदान करते,

त्यामुळे घरात अन्न धान्य व धन व सुख समाधान याची कमतरता येत नाही, म्हणूनच आजच्या

कथेतील सिद्धीदात्री ला विशेष महत्व आहे,

नवरात्री कथा मालिका समारोप

ज्या प्रमाणे नवव्या दिवशी या नवदुर्गेच्या पूजनाने नवरात्रीची

पूर्णाहुती होते

त्याचप्रमाणे वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारी

कथा नवरात्रीच्या ही मालिका अतिशय गोड वळणावर पूर्णत्वास जात आहे,

**दैनिक गावकरी च्या मुख्य संपादकांचे आभार**

वाचकहो कथा नवरात्रीच्या ✻ या कथा पत्रकार महोदयांच्या माध्यमातून आपणापर्यंत पोचल्या असल्या तरी या साठी मा,संपादक साहेबांचे महत्वाचे योगदान असते, वृत्तपत्र छापताना लिखाणाची योग्यतेनुसार निवड केली जाते,

नंतर त्या लेखासाठी वृत्तपत्रात जागा करून ते लिखाण वृत्तपत्रात योग्य ठिकाणी छापले जाते या साठी एखादी बातमी पुढील अंकात घ्यावी लागते, या सर्व बाबी मुख्य संपादकाला लक्षात घ्याव्या लागतात, या सर्व बाबी आपल्या कथा नवरात्रीच्या या मालिकेसाठी समर्थ गावकरीचे मुख्य संपादक,

व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सचिव मा, डॉ, विश्वासराव आरोटे साहेबांनी आपणास उपलब्ध करून दिल्या आणि मालिकेच्या उत्तरायनापर्यंत आपण पोचले, ही मालिका पूर्ण झाली म्हणून त्यांचे माझ्याकडून व वाचकांकडून विशेष आभार, माता सिद्धीदात्री त्यांच्या आयुष्यात उत्तम आरोग्य यश शांती व समृद्धी देवो

**सर्व वाचकांना विजयादशमीच्या मनःपूर्वक शुभेच्छा,**

**वृत्त संकलन,**
**कोतुळ प्रतिनिधी**
**अशोकराव शेळके**
**९९२१५८३९९७**

**कथा पुष्प नववे**




# हरिष दिमोटे यांना स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**राजूर (समर्थ गांवकरी)**

पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याचे माध्यम नसून, समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी आणि लोकशाही अधिक बळकट करणारी एक महत्त्वाची शक्ती आहे.

अशाच पत्रकारितेच्या क्षेत्रात लेखणीच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर उल्लेखनीय योगदान देणारे न्यूज १८ मराठीचे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी श्री. हरीष दिमोटे यांना स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे..

लोकहक्क फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा हा पुरस्कार ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकारांच्या कार्याचा गौरव करणारा आहे.

संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष लहू कानडे यांच्या पुढाकारातून आयोजित या पुरस्कार सोहळ्यात पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेतली जात आहे.

श्री. हरीष दिमोटे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून



जनसामान्यांचे प्रश्न, सामाजिक विषय आणि परिसरातील महत्त्वाच्या घडामोडींना सातत्याने वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड होणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी, दुपारी १ वाजता, लोकहक्क फाउंडेशन संचलित संशोधन, प्रशिक्षण आणि विकास अकादमी, सराला, श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे.

या सन्मानाबद्दल हरीष दिमोटे यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# युवा कल्पकतेने केले मुक्या मातीला बोलके!

**नांदेड (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानतीर्थ-२०२६' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात रविवारी तरुणाईच्या कल्पकतेचा अनोखा आविष्कार पाहायला मिळाला. मृदमूर्तीकला स्पर्धेत नव्या पिढीतील युवा कलावंतांनी मातीशी नाते जोडत आपल्या सर्जनशीलतेतून मुक्या मातीला जणू बोलके केले. रांगोळीतून रंगांची मुक्त उधळण, तर कलात्मक जुळवणीतून टाकाऊ वस्तूंना नवे रूप देत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रभावी छाप पाडली.

सायन्स कॉलेजच्या विस्तीर्ण प्रांगणात सुरू असलेल्या या युवक महोत्सवात स्मिता पाटील मंचावर रविवारी मृदमूर्तीकला, रांगोळी आणि कलात्मक जुळवणी या तीन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, कलात्मक दृष्टी आणि सर्जनशीलतेचे प्रभावी दर्शन घडले.

मातीच्या कणाकणातून साकारले कुटुंबाचे भावविश्व

मृदमूर्तीकला स्पर्धेत ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धकांना सव्वा किलो शाडू मातीचा गोळा, थोडी कोरडी शाडू माती, जाड पुठ्ठा आणि रद्दी कागद आदी साहित्य संयोजकांकडून उपलब्ध करून देण्यात आले होते. या स्पर्धेसाठी 'कुटुंब' (ऋाळश्रू) हा विषय देण्यात आला होता. मानव, पशू किंवा पक्ष्यांच्या कुटुंबातील दोनपेक्षा अधिक घटकांचा समावेश असलेली मृदमूर्ती साकारण्याचे आव्हान स्पर्धकांसमोर होते.

या विषयाला आपल्या कल्पकतेची जोड देत युवा कलावंतांनी मातीच्या गोळ्यातून कुटुंबातील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी आणि नात्यांची वीण उलगडणाऱ्या आकर्षक कलाकृती साकारल्या. मातीला आकार देताना स्पर्धकांची एकाग्रता, हातातील कौशल्य आणि कलात्मक जाण विशेष

**■ ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात मृदमूर्तीकलेतून तरुणाईने जोडले मातीशी नाते**
**■ रांगोळीतून रंगांची उधळण; कलात्मक जुळवणीतून टाकाऊ वस्तूंना नवे रूप**

लक्षवेधी ठरली. त्यांच्या कल्पकतेच्या परिसस्पर्शाने निर्जीव मातीला जणू भावभावनांचे जिवंत रूप प्राप्त झाले. मातीच्या प्रत्येक कणातून व्यक्त होणाऱ्या या कलाविष्काराने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात रांगोळी स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत रंगांच्या माध्यमातून आपल्या कल्पनाविश्वाला मुक्त वाट करून दिली. विविध रंगछटा, आकर्षक रचना आणि नाजूक रंगरेषांच्या साहाय्याने स्पर्धकांनी मनोहारी रांगोळ्या साकारल्या.

कलावंतांच्या बोटांची जादू आणि रंगरेषांची जुगलबंदी यामुळे संपूर्ण परिसर






रंगमय झाला होता. प्रत्येक रांगोळीतून तरुणाईच्या मनातील भावना, कल्पकता आणि सौंदर्यदृष्टीचे दर्शन घडत होते. रंगांच्या माध्यमातून व्यक्त झालेला हा कलात्मक आविष्कार म्हणजे जणू तरुणाईच्या सर्जनशीलतेचा रंगोत्सवच ठरला.

कलात्मक जुळवणी स्पर्धेलाही विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत ३३ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. कल्पकता, निरीक्षणशक्ती आणि कृतीकौशल्याचा कस पाहणाऱ्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून आकर्षक कलाकृती साकारल्या.

निरुपयोगी समजल्या जाणाऱ्या वस्तूंमध्येही सौंदर्य आणि उपयुक्तता दडलेली असते, हे स्पर्धकांनी आपल्या कलाविष्कारातून दाखवून दिले. टाकाऊ साहित्याची कलात्मक मांडणी करत त्यांनी साध्या वस्तूंनाही नवा अर्थ आणि आकार दिला. त्यांच्या या कल्पकतेमुळे 'वेस्ट टू बेस्ट' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार झाल्याचे पाहायला मिळाले. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांबरोबरच पुनर्वापर आणि पर्यावरणपूरक विचारांनाही चालना मिळाली.

या तिन्ही स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. माधव हळदीकर, डॉ. सिद्धार्थ नागठाणकर, डॉ. पंढरीनाथ धोंडगे, डॉ. राजश्री जाधव, डॉ. प्रकाश शिंदे, डॉ. विजया साखरे, प्रा. सुनील कदम, डॉ. विजयकिरण नरवाडे, प्रा. प्रवीण मुळे, उत्तम पावडे, श्रीकृष्ण हंबर्डे, डॉ. शैलजा वडजे, डॉ. स्मिता चालीकवार, प्रा. अनुजा पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले.

'ज्ञानतीर्थ-२०२६' युवक महोत्सवातील या कलास्पर्धांनी तरुणाईच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. माती, रंग आणि टाकाऊ वस्तूंच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींमुळे महोत्सवात सर्जनशीलतेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

# चारा विक्री व वाहतुकीवरील निर्बंधांची अर्धापूरमध्ये काटेकोर अंमलबजावणी

**जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलिस प्रशासनाची कारवाई**

**नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन**




**नांदेड (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील चारा टंचाईसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी उपलब्ध चारा राखीव ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांनी दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार चारा पिकांचे अवशेष, कडबा व वैरण यांच्या विक्री आणि वाहतुकीवरील निर्बंधांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या अनुषंगाने अर्धापूर येथे पोलिस प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली.

या कारवाईच्या वेळी अर्धापूरचे तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दिलीप उदगिरे उपस्थित होते. जिल्ह्यात निर्माण झालेल्या चारा टंचाईच्या संभाव्य परिस्थितीत उपलब्ध चारा स्थानिक पशुधनासाठीच उपलब्ध राहावा, पशुपालकांच्या चाऱ्याची गरज प्राधान्याने पूर्ण व्हावी आणि शासनाच्या आदेशांचे प्रभावीपणे पालन सुनिश्चित व्हावे, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

**पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर**

चारा पिकांचे अवशेष, कडबा व वैरण यांची अनधिकृत विक्री किंवा जिल्ह्याबाहेर वाहतूक झाल्यास स्थानिक पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लागू निर्बंधांचे उल्लंघन होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

पशुधनाचे संरक्षण, उपलब्ध चाऱ्याचे योग्य नियोजन आणि पशुपालकांचे हित जपण्यासाठी जिल्ह्यातील नागरिक, पशुपालक, व्यापारी तसेच संबंधित घटकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार लागू करण्यात आलेल्या चारा विक्री व वाहतुकीवरील निर्बंधांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# भोकरमध्ये पाणीटंचाईचा बडगा, तरीही विकासकामांच्या नावाखाली पाण्याची नासाडी!

**■ एकीकडे दुष्काळग्रस्त जाहीर, दुसरीकडे शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत; नगरपरिषद प्रशासनाच्या भूमिकेवर संताप**

**■ एकलारे कन्स्ट्रक्शनची सुरू असलेली कामे तातडीने बंद करून वर्कऑर्डर रद्द करा; अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडणार : राजेश्वर देशमुख यांचा इशारा**

**भोकर (समर्थ गांवकरी)**

राज्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने महाराष्ट्र शासनाने भोकर शहर व तालुका दुष्काळग्रस्त घोषित केला आहे. अशा गंभीर परिस्थितीत नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात असताना, दुसरीकडे भोकर शहरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोप नगरपरिषदेचे नगरसेवक प्रभाग क्रमांक ५ चे राजेश्वर विनायकराव देशमुख यांनी केला आहे. या विरोधाभासी परिस्थितीमुळे नगरपरिषद प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांच्या मूलभूत गरजांपेक्षा विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

**दुष्काळात पाण्याचे नियोजन कुठे हरवले?**

भोकर शहरातील एकलारे कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकासकामांमुळे शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पावसाळ्यातच पाण्याची अशी आबाळ होत असेल, तर आगामी हिवाळा आणि उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी किती गंभीर परिस्थितीला सामोरे जावे लागेल, याचा विचार प्रशासनाने गांभीर्याने करावा, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

शहरातील नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करणे ही नगरपरिषद प्रशासनाची जबाबदारी असताना, विकासकामांच्या नावाखाली पाणीपुरवठा बाधित होणार असेल तर संबंधित कामांचे नियोजन आणि अंमलबजावणी तपासण्याची गरज आहे. विकासकामे महत्त्वाची असली, तरी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून ती राबविणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

**एक दिवसाआड पाणीपुरवठ्याची घोषणा; अंमलबजावणीवर प्रश्न**

नगरपरिषद प्रशासनाकडून शहरातील जनतेला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. मात्र, पावसाळ्यातही पाण्याबाबत नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर पुढील काळातील पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

**विकासकामे थांबवा, वर्कऑर्डर रद्द करा!**

भोकर शहरातील एकलारे कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून सुरू असलेली विकासकामे तसेच इतर संबंधित कामे तातडीने थांबवावीत आणि संबंधित कंत्राटदाराला देण्यात आलेली कामाची वर्कऑर्डर रद्द करावी, अशी ठाम मागणी राजेश्वर विनायकराव देशमुख यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीची गांभीर्याने दखल न घेतल्यास नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, नांदेड यांनाही देण्यात आली आहे. आता नगरपरिषद प्रशासन या तक्रारीची कितपत दखल घेते, पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर कोणती ठोस पावले उचलते आणि संबंधित विकासकामांबाबत काय निर्णय घेते, याकडे भोकरकरांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त नवनाथ औटी यांचा सत्कार

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त दि:-१५ऑक्टोबर रोजी अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर ता:- जुन्नर येथील ग्रंथालय विभागा च्या वतीने ओतूर येथील वृत्तपत्र विक्रेते नवनाथ औटी यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. महाविद्याल याचे ग्रंथपाल डॉ. निलेश हांडे व प्रमोद थोरवे यांच्या हस्ते नवनाथ औटी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट,उप प्राचार्य डॉ. के. डी. सोनवणे, मराठी विभागप्रमुख डॉ.वसंत गावडे, गणेश डुंबरे व जिल्हा परिषद पुणेच्या सदस्या डॉ. छाया तांबे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. वृत्तपत्र विक्रेते हे समाजातील महत्त्वाचे घटक असून,दररोज सकाळी घरोघरी वृत्तपत्र पोहोचवून समाजाला देश- विदेशा तील घडामोडींची माहिती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करतात.ऊन, वारा,पाऊस यांची तमा न बाळगता ते आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतात.त्यांच्या या कार्याचा गौरव व्हावा,त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी,या उद्देशाने या सत्कार समारंभाचे आयोजनकरण्यात आले होते. वृत्तपत्र विक्रेत्यांचे समाजप्रबोधनातील योगदान, लोकशाहीच्या बळकटीकरणातील भूमिका,जनसामान्यां पर्यंत माहिती पोहोचविण्याचे कार्य यांचे मान्यवरांनी कौतुक केले.अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांच्या कार्याची दखल घेतली जाते त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळते,असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रंथालय विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. वृत्त पत्र विक्रेत्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### एकलहरे येथे कमलजादेवी नवरात्रोत्सव उत्साहात

**१५ लाखांच्या सभामंडपाचे उद्घाटन**

**मंचर (समर्थ गांवकरी)**

एकलहरे, ता.आंबेगाव येथील जागृत देवस्थान श्री कमलजादेवी मंदिरात नवरात्रोत्सव उत्साहात साजरा होत आहे.माजी खासदार तथा म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंदिराला भेट दिली.त्यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेल्या १५ लाख रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेल्या सभामंडपाचे उद्घाटन करण्यात आले. गावातील तरुण, महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत दररोज आरती,भजन आणि देवीचा जागर होत आहे.



पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेल्या १५ लाख रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेल्या सभामंडपाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी मोशीच्या नगरसेविका सारिका रवींद्र गायकवाड, भैरवनाथ पतसंस्थेचे उपाध्यक्ष सागर काजळे,माजी तालुकाप्रमुख संतोष डोके,नगरसेवक सुनील बाणखेले, शिवाजी राजगुरू, सरपंच राणी वैभव खैरे,उपसरपंच प्रदीप शिंदे, माजी उपसरपंच प्रीती डोके, ग्रामपंचायत सदस्या रीना डोके, विमल शिंदे, योगिता शिंदे, पोलीस पाटील सुमनताई फलके, मंडळाचे अध्यक्ष देविदास डोके, किसन महाराज डोके, माजी उपसरपंच स्वप्निल डोके, ज्ञानेश्वर डोके, किसन लोंढे, रवींद्र गायकवाड आणि श्याम डोके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सभामंडपामुळे भाविकांची सोय होणार असल्याने ग्रामस्थांनी शिवाजीराव आढळराव पाटील यांचे आभार मानले.

# जामखेड हादरले ! देवीच्या दर्शनाच्या गर्दीत खिसेकापूचा धुमाकूळ

**पकडायला गेलेल्या पोलीस कॉन्स्टेबल कुलदीप घोळवे यांच्या डोक्यात काठीचा वार!**

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

**जेथे पोलीसच सुरक्षित नाहीत, तेथे सर्वसामान्यांचे काय? जामखेडमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर!**

जामखेड शहरात संशयित आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात पोलीस कॉन्स्टेबल कुलदीप घोळवे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जामखेड येथील समर्थ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पोलिसांवरच हल्ले होत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचे काय? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संशयित आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसालाच हल्ल्याला सामोरे जावे लागत असल्याने पोलिसांचा धाक कमी झाला आहे का, अशी चर्चाही शहरात सुरू आहे.

**कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर!**

जामखेड शहरात दहशत माजविणाऱ्या टवाळखोरांना कायद्याचा धाक राहिला आहे की नाही, असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहे. कायद्याचे रक्षण करणाऱ्या पोलिसांवरच हल्ले होत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांनी सुरक्षिततेची अपेक्षा कोणाकडून करायची, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

शहरातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. जामखेडमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सक्षम नेतृत्व, प्रभावी पोलीस कारवाई आणि गुन्हेगारी प्रवृत्तींवर कठोर नियंत्रण आवश्यक असल्याची नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!या घटनेमुळे जामखेड शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस कर्मचाऱ्यांवरील हल्ल्याच्या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, जखमी पोलीस कॉन्स्टेबल कुलदीप घोळवे यांच्यावर समर्थ हॉस्पिटल येथे उपचार सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



# चाईल्ड फंड इंडियाच्या माध्यमातून शाळांमध्ये ग्रीन स्कुल समिती स्थापन

**विद्यार्थ्यांच्या सहभागातून हरित क्रांतीला सुरुवात**



**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी काम करीत असलेल्या चाइल्ड फंड इंडिया यांच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यातीलशाळांमध्ये ग्रीन स्कुल समित्यांचीस्थापना करण्यात आली आहे.विद्या र्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धना विषयी जागरूकता निर्माण करणे,वृक्षारोपण तसेच वृक्ष संवर्धनाला प्रोत्साहन देणे आणि शालेय परिसर स्वच्छ व हरित ठेवणे,प्लास्टिकचा वापर टाळणे हा या उपक्रमा चा मुख्य उद्देश आहे.पाण्याची कमतरता सध्या प्रदूषण, वृक्षतोड,वातावरणातील हवामानातील बदल या पर्यावरणीय समस्यांचे गांभीर्य लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासूनच पर्यावरणपूरक सवयी रुजवणे आवश्यक आहे.याच दृष्टि कोनातून चाइल्ड फंड इंडिया यांच्या माध्यमातून शालेय स्तरावर ग्रीन स्कुल कमिट्या स्थापन करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे.आणि या ग्रीन कमिटीच्या स्थपन व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शक पर्यावरण अभ्यासक रविंद्र भोर करीत आहे.

या समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धना च्या विविध उपक्रमांमध्ये सह- भागी करून घेतले जाणार आहे शाळेच्या परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करणे,पाण्याचा काटकसरीने वापर करणे,प्लास्टिकचावापर कमी करणे कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे यांसारख्या उपक्रमांवर भर दिला जाणार आहे.ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन मान उंचावण्यासोबतच मुलां च्या सर्वांगीण विकासा साठी विविध उपक्रम राबविण्यावर संस्थेकडून भर देण्यात येत आहे.

> जुन्नर तालुक्यातील प्रत्येक शाळेत 'ग्रीन कमिटी' स्थापन करून पर्यावरण रक्षणाचे अधिक उत्तम काम उभे केले जाईल,असा भरवसा चाइल्ड फंड इंडियाचे प्रकल्प व्यवस्थापक अभिजित मदने यांनी व्यक्त केला.म्हणूनच केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून आणि उपक्रमांतून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व शिकवण्या वर विशेष भर दिला जात आहे.
>
> **-अभिजित मदने, चाइल्ड फंड प्रकल्प व्यवस्थापक**

# पहाटेच्या दुर्गादौडीने कोतूळमध्ये उत्साहाचे वातावरण!

**कोतूळ (समर्थ गांवकरी)**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ओम साईराम प्रतिष्ठान व हिंदुत्ववादी संघटना यांच्या वतीने पहाटेच्या दुर्गादौडीमुळे कोतूळ परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दुर्गा देवीचे दुसरे वर्ष आहे.

देवीचा जयघोष, भगवे ध्वज आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणाऱ्या महिला व युवकांमुळे परिसरात चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे.

पहाटेच्या सुमारास आयोजित करण्यात येणाऱ्या या दुर्गादौडीत महिला व युवकांसह नागरिकही उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. हातात भगवे ध्वज घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात येणाऱ्या दुर्गादौडीमुळे परिसरातील वातावरण भक्तिमय होत आहे. देवीच्या जयघोषाने रस्ते दुमदुमत असून, नागरिकांकडूनही या उपक्रमाला प्रतिसाद मिळत आहे.

दुर्गादौड हा केवळ धार्मिक उपक्रम नसून युवकांमध्ये शिस्त, संघभावना, व्यायामाची आवड आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारा उपक्रम ठरत आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या युवकांमुळे सामाजिक एकोपा वाढण्यासही मदत होत आहे. जागोजागी भगव्या ध्वजाचे औक्षण व फुले उधळून या दवडीचे स्वागत करण्यात येत आहे



पहाटेच्या दुर्गादौडीची परंपरा टिकवून ठेवण्यासाठी कार्यकर्ते आणि युवक परिश्रम घेत असून, दरवर्षी या उपक्रमाबद्दल नागरिकांमध्ये उत्सुकता वाढत आहे. भक्ती, उत्साह आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या दुर्गादौडीमुळे कोतूळ परिसरात नवरात्रोत्सवाची रंगत वाढली आहे.

# श्रद्धा कर्मवीरांचा 'रयत' विचार सातासमुद्रापार पोचवणार : मीनाताई जगधने

**■ 'माझ्या नावापूर्वी सरांचे नाव घ्यावे' : संशोधक श्रद्धा लोंढे**

**■ राष्ट्रीय विजेत्या श्रद्धा लोंढे व मार्गदर्शक सुभाष गायकवाड यांचा गौरव**

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, चांडगाव येथील विद्यार्थिनी कु. श्रद्धा रमेश लोंढे हिने इन्स्पायर मानक अवॉर्डअंतर्गत दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या ख मॉडेलची आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याने चांडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या यशाबद्दल श्रद्धा व तिचे मार्गदर्शक शिक्षक सुभाष गायकवाड यांचा शरद पवार साहेब यांच्या भगिनी तथा मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने व बाबासाहेब भोस यांनी चांडगावात प्रत्यक्ष येऊन कौतुक सोहळा पार पडला.

आपल्या यशाचे श्रेय सुभाष गायकवाड सरांच्या मार्गदर्शनाला व मेहनतीला देत, भविष्यात या पुरस्काराचा उल्लेख करताना आपल्या नावापूर्वी सरांचे नाव घेतले जावे, अशी भावनिक अपेक्षा श्रद्धाने व्यक्त केली. तिच्या मनोगताने उपस्थितांची मने जिंकली.

महात्मा फुलें, सावित्रीबाई , कर्मवीरांनी केलेल्या शिक्षणाच्या प्रचार-प्रसारामुळे आज श्रद्धा राष्ट्रीय स्तरावर झेप घेऊ शकली. श्रद्धा कर्मवीरांचा 'रयत' विचार सातासमुद्रापार पोचवणार असा आशावाद व्यक्त केला . सुभाष गायकवाड सर यांनी दीपस्तंभाप्रमाणे कार्य करून इतर शिक्षकांपुढे आदर्श निर्माण केला आहे असे प्रतिपादन मीनाताई जगधने यांनी केले.

बाबासाहेब भोस यांनी श्रद्धाचे कौतुक करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

उत्तर विभागीय गुणवत्ता विकास कक्षाचे काकासाहेब वाळुंजकर, तुकाराम कन्हेकर व नवनाथ बोडखे यांनीही अभिनंदन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, सुधीर साबळे, रविंद्र म्हस्के यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुधीर साबळे यांनी केले, तर आभार राजेंद्र म्हस्के यांनी मानले. याप्रसंगी स्कूल कमिटी सदस्य दत्तात्रय वाघ, विनायक रसाळ,




मा रवींद्र(नाना) म्हस्के महादेव म्हस्के, महेंद्र म्हस्के, संतोष म्हस्के, ज्ञानेश्वर दरेकर, अभिमान सोनवणे प्रा कल्पना झगडे, गणेश वाळुंज, वृषाली दरेकर, प्राचार्य डॉ प्रकाश साळवे .मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, वर्षा भोईटे, दत्तात्रय मोरे, राजेंद्र खेडकर विक्रम घालमे सचिन ससाणे हौसराव दांगडे यांच्यासह विविध मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी ५१ हजारांची देणगी!



**गणोरे (समर्थ गांवकरी)**

गणोरे (ता. अकोले) येथील विवेक पंढरीनाथ आहेर यांच्या मातोश्री कै. कौशाबाई पंढरीनाथ आहेर यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त धार्मिक कार्यक्रमांवरील अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. प्रवचन, भजन, कीर्तन व मंडप आदींवरील खर्च टाळून रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी ५१ हजार रुपयांचा देणगीचा धनादेश विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक संजय आंबरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. कै. कौशाबाई आहेर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शैक्षणिक कार्यासाठी देणगी देण्याचा आहेर कुटुंबीयांचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. अनावश्यक खर्च टाळून शिक्षणासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रासाठी आर्थिक योगदान देत त्यांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक संजय आंबरे, मनोज आंबरे, सोसायटीचे माजी अध्यक्ष अशोक आहेर, अकोले तालुका देखरेख संघाचे कार्यकारी अधिकारी अंबादास दातीर, विवेक आहेर, भाग्यश्री आहेर, रोहिणी वैद्य, प्रशांत आंबरे, दीपक आंबरे, सुभाष आहेर, संदीप आंबरे, सूर्यभान दातीर, बाबासाहेब आंबरे, संजय आंबरे आदी उपस्थित होते. शैक्षणिक कार्यासाठी दिलेल्या या योगदानाचे परिसरातून कौतुक होत आहे.

## सिडको-हडको परिसरात दुर्गा देवी मंडळांना भेटी देऊन नगरसेवक संजय पाटील घोगरे यांचे पाणी बचतीचे आवाहन



**नवीन नांदेड (समर्थ गांवकरी)**

सिडको-हडको परिसरातील अनेक दुर्गा देवी मंडळांना नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २० चे कर्तव्यदक्ष नगरसेवक म्हणून परिचित असलेले संजय पाटील घोगरे यांनी भेटी दिल्या. या भेटीच्या माध्यमातून त्यांनी कोरड्या दुष्काळामुळे पाणी बचत करण्याचे आवाहन केले आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात कोरडा दुष्काळ पडला आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आपापल्या घरी पाणी काटकसरीने वापरावे, अनावश्यक पाण्याचा वापर टाळावा, नळाचे पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी. पाणी भरून झाल्यावर नळ त्वरित बंद करावा, जेणेकरून पाणी वाया जाणार नाही. पाण्याचे जतन करूनच पाणी वापरावे, अशी विनंती आणि आवाहन नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी केले. दुर्गा देवी मंडळांना भेटी दरम्यान त्यांनी महिला व नागरिकांशी संवाद साधत शेकडो महिला, पुरुष आणि नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले. अनेक ठिकाणी महिला मंडळी आणि पुरुष वर्गाने त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. दुर्गा देवी मंडळातील पदाधिकाऱ्यांनीही जनजागृती करण्याचे काम हाती घेतले असून संजय पाटील घोगरे यांच्या आवाहनाचे कौतुक केले जात आहे.

## परंपरा जपत आधुनिकतेची कास धरा : माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील



**मंचर (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थिनींनी पारंपरिक संस्कृतीचे जतन करत आधुनिकतेची कास धरावी आणि सर्वांगीण विकास साधावा,असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले. श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने लांडेवाडी ता.आंबेगाव येथील शिवसंकुलात महाभोंडला आणि रास दांडिया कार्यक्रम उत्साहात पार पडला. संस्थेच्या विविध शैक्षणिक विभागांतील सुमारे १,५०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.१२० गायक व वादक विद्यार्थ्यांच्या महावाद्यवृंदाने सलग तीन तास सुरेल संगीताची मैफल रंगवली.कार्यक्रमाची सुरुवात दुर्गामातेच्या मूर्तीचे आणि भोंडल्याच्या हत्तीचे पूजन करून झाली.संस्थेचे अध्यक्ष, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, कल्पना आढळराव पाटील, पिंपरी-चिंचवडच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, प्रशासन अधिकारी शामल चौधरी, नीलिमा थोरात, शबनम मोमीन, रजनी बाणखेले, डॉ. संजय चौधरी, सुनील गावशेते आणि डॉ. जे. पी. भोसले उपस्थित होते.न्यू इंग्लिश स्कूल, श्री शिवाजीराव आढळराव पाटील विद्यालय, डेक्कन मराठा कनिष्ठ महाविद्यालय, बी.एड. आणि एम.बी.ए. विभागांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पारंपरिक गीतांवर विद्यार्थिनींनी भोंडल्याचे फेर धरले. त्यानंतर मराठी व हिंदी गीतांच्या तालावर रास दांडिया रंगला.संगीत शिक्षक सचिन गाडे, मनोज सावंत आणि नृत्यशिक्षिका नेहा नांगरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सीमा काळे यांनी केले.

# सेवा संकल्प अभियान अंतर्गत विशेष शिक्षकांचा राज्यस्तरीय सन्मान प्रमाणपत्र देऊन गौरव

### मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात प्रमाणपत्र वितरण

**ठाणे (समर्थ गांवकरी)**




सेवा संकल्प अभियान अंतर्गत बौद्धिक अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसोबत कार्यरत विशेष शिक्षकांना राज्यस्तरीय सन्मान प्रमाणपत्रांचे वितरण दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणे सभागृह येथे करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते ही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सकपाळ तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षक दिन २०२६ निमित्त दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील विशेष शिक्षकांसाठी राज्यस्तरीय ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन करून राज्यातील विशेष शिक्षकांच्या योगदानाची दखल घेत त्यांचा गौरव केला. त्याच अनुषंगाने दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, पुणे यांच्या सूचनेनुसार ही प्रमाणपत्रे जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

राज्यातील बौद्धिक अक्षम (मतिमंद प्रवर्ग) विशेष शाळांमध्ये सन २०१९ पासून दिशा अभियान राबविण्यात येत आहे. जय वकील फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर, मुंबई यांनी तयार केलेल्या व NIEPID या राष्ट्रीय संस्थेने प्रमाणित केलेल्या एकसमान अभ्यासक्रमाद्वारे ३ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम (IEP), बहुसंवेदी अध्यापन पद्धती, दिशा वेब पोर्टल आणि शिक्षक प्रशिक्षण हे या अभियानाचे प्रमुख घटक आहेत.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या पै.सिद्धी होळकरची पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी निवड




**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सोमेश्वरनगर येथे झालेल्या सा.फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या खेळाडू पै.सिद्धी होळकर हिने ७६ kg वजन गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवून तिची पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धे साठी निवड झाली आहे. व ६८ kg.वजन गटामध्ये पै.कामिनी देवीकर हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर पै.सोनाली दरेकर हिने ५३ kg. वजन गटामध्ये तृतीय क्रमांक मिळविला.

सिद्धी व कामिनी तसेच सोनाली यांच्या पालकांनी कुस्ती सारख्या आव्हानात्मक खेळामध्ये आपल्या मुलींना खेळण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून, ग्रामीण भागातील मुलींसमोर व पालकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या खेळाडू मुलींचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात व श्रीगोंदा परिसरात कौतुक होत आहे.

त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य प्रो.डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, उपप्राचार्य व जिमखाना विभाग प्रमुख डॉ.नितीन थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी कुस्ती खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा.कल्पना बागुल व क्रीडा शिक्षक संजय डफळ, अनिल होळकर व पंढरीनाथ देविकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# ब्राम्हणवाडा प्राथमिक केंद्र शाळेत वन चेतना फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ पाबळे यांच्या दातृत्वातून आरओ प्लांटचे उद्घाटन!

**ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)**





अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील प्राथमिक केंद्र शाळेत वन चेतना फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ तुकाराम पाबळे यांच्या दातृत्वातून आरओ प्लांट बसविण्यात आला. या आरओ प्लांटचे आज उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शुद्ध व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक संस्थेला दिलेल्या या योगदानाचे उपस्थितांनी कौतुक केले.

या उद्घाटनप्रसंगी वन चेतना फाउंडेशनचे सर्व सदस्य, केंद्रप्रमुख संदीप लबडे, मुख्याध्यापक दत्तात्रय गोपाळे सर, सोपान हुलवळे, डॉ. प्रदीप कुमकर, डॉ. निलेश कडाळी, गोरख पावडे, तुषार हुलवळे, मुराद पटेल, रितेश भळगट, मुक्तार मणियार, दीपक गोंदके, पत्रकार संजय गायकर, नवनाथ पवार तसेच ग्रामस्थ शौकत पटेल उपस्थित होते.

# माय माऊली केअर सेंटर, कात्रज, पुणे येथे नवरात्री स्पेशल माताजी की चौकी भक्तिमय वातावरणात संपन्न

**पुणे (समर्थ गांवकरी)**



माय माऊली केअर सेंटर, कात्रज, पुणे येथे नवरात्र महोत्सवाच्या पाचव्या माळेचे औचित्य साधून बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत नवरात्री स्पेशल माताजी की चौकी हा भक्तिपूर्ण कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन सौ. शोभा सोलंकी (जय पद्मावती माँ), यांनी केले होते. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून समाजरत्न, दानशूर, उद्योगरत्न, समाजभूषण माननीय शेठ नानजीभाई ठक्कर ठाणाववाला हे उपस्थित होते.

यावेळी देवीच्या भक्तिगीतांचा, भजनांचा कार्यक्रम झाला. देवीभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आनंद घेतला. विशेषतः महिलांनी देवीसमोर गरबा खेळून आनंदोत्सव साजरा केला. संपूर्ण परिसर जय माता दी च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व देवीभक्तांनी सुरुची भोजनाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे निमंत्रक व आयोजक श्री. विठ्ठलराव वरुडे पाटील, संस्थापक अध्यक्ष, माय माऊली केअर सेंटर, कात्रज, पुणे आणि सौ. शोभा सोलंकी जय पद्मावती माँ, हे होते.

विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित असणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले तसेच अशा प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमाचे वेळोवेळी आयोजन केले जाते, याचा लाभ घेत जाणे यामुळे जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. आणि यामुळे विचारात बदल होऊन घर संसार सुखी आणि आनंदी समृद्ध होत असतो...

# प्राथमिक शिक्षिका ते सहाय्यक संचालक!

### ज्योती बेल्हेकर यांची MPSC परीक्षेत दमदार कामगिरी, महिलांमध्ये राज्यात प्रथम क्रमांक!

**(समर्थ गांवकरी)**



जिद्द, मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि ध्येयाप्रती असलेल्या निष्ठेच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हे ज्योती बेल्हेकर यांनी आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. प्राथमिक शिक्षिका म्हणून आपल्या सेवाकार्याची सुरुवात करून महिला व बालविकास अधिकारी पदापर्यंत मजल मारल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) परीक्षेद्वारे सहाय्यक संचालक पदापर्यंत झेप घेतली आहे. या परीक्षेत महिलांमध्ये राज्यात प्रथम क्रमांक मिळवल्याची माहिती असून, त्यांची अहिल्यानगर येथे नियुक्ती झाली आहे.

ज्योती बेल्हेकर यांचा हा प्रवास अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करताना त्यांनी प्रशासकीय सेवेत उच्च पदावर पोहोचण्याचे ध्येय समोर ठेवले. त्यासाठी अभ्यास, मेहनत आणि सातत्य यांच्या बळावर त्यांनी आपल्या कारकिर्दीत महत्त्वाचे टप्पे पार केले. त्यांच्या यशाबद्दल जामखेड, साकत, नेवासा, सोनई परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महिला व बालविकास अधिकारी म्हणून काम करताना महिला आणि बालकांच्या कल्याणाशी संबंधित प्रशासकीय कामकाजाचा अनुभव त्यांना मिळाला. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या माध्यमातून सहाय्यक संचालक पदापर्यंत पोहोचत त्यांनी आपल्या यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

महिलांमध्ये राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्याची कामगिरी ही त्यांच्या मेहनतीचे आणि ध्येयाप्रती असलेल्या समर्पणाचे प्रतीक मानली जात आहे. प्राथमिक शिक्षिका ते अधिकारी आणि आता सहाय्यक संचालक असा त्यांचा प्रवास अनेक विद्यार्थिनी, महिला कर्मचारी आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना नवी प्रेरणा देणारा आहे.

अहिल्यानगर येथे सहाय्यक संचालक म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील नवा अध्याय सुरू झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे ‘जागतिक शांतता’ विषयावर भव्य चित्रकला स्पर्धा

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये जागतिक शांततेचे महत्त्व रुजविण्यासह त्यांच्या कलागुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे ‘जागतिक शांतता’ या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे १८ वे वर्ष असून, रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता कॉलेज रोड येथील मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे ही स्पर्धा होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेतील प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

जागतिक स्तरावर शांतता, बंधुभाव, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश चित्रकलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला रंगांच्या माध्यमातून अभिव्यक्त करावे, तसेच बालवयापासूनच त्यांच्या मनात शांतता आणि सामाजिक सलोख्याचे संस्कार रुजावेत, या हेतूने लायन्स क्लब ऑफ संगमनेर सफायर सातत्याने हा उपक्रम राबवत असल्याचे संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी व माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी यांनी सांगितले.

## गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे पाच गट करण्यात आले असून, प्रत्येक गटातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक एक हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ७०० रुपये व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक ५०० रुपये व प्रमाणपत्र, तर चतुर्थ, पाचवे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून प्रत्येकी २०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अशा प्रकारे एकूण १४ हजार रुपयांची पारितोषिके वितरित केली जाणार आहेत.

स्पर्धेसाठी चित्र पूर्ण करण्याकरिता दोन तासांचा कालावधी देण्यात येणार आहे. चित्रासाठी आवश्यक ड्रॉइंग शीट आयोजकांकडून उपलब्ध करून दिली जाणार असून, रंग, पेन्सिल आणि इतर चित्रकला साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणायचे आहे. वॉटरकलर, क्रेयॉन, पेन्सिल कलर यांसारख्या विविध माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांना आपली कलाकृती साकारता येणार आहे.

या स्पर्धेला मालपाणी ग्रुप, संगमनेर यांचे सौजन्य लाभले आहे. प्रकल्प प्रमुख म्हणून सुनीता मालपाणी, डॉ. जितेंद्र पाटील, देविदास गोरे आणि निशांत काळे काम पाहत आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्लबचे अध्यक्ष जितेश लोढा, सचिव नम्रता अभंग आणि खजिनदार चंद्रशेखर गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबचे पदाधिकारी व सदस्य प्रयत्नशील आहेत.

प्रकल्प समितीमध्ये गिरीश मालपाणी, श्रीनिवास भंडारी, महेश डांग, अतुल अभंग, धनंजय धुमाळ, कल्याण कासट, उमेश कासट, सुदीप हासे, अक्षय गोरले, व्यंकटेश अमृतवाड, नितीन नवले, चैतन्य काळे, चेतन जोर्वेकर, गिरीश गांधी, कल्पेश मर्दा, संतोष अभंग, चिंतन शाह, स्वाती लोढा, अंजली



पाटील, सोनल गोरले, चैताली जोर्वेकर, प्रिती काळे, अनन्या धुमाळ, पूजा कासट, प्रियंका कासट, मिनल अभंग, सुचित्रा कुटे, पायल शाह, प्रियंका हासे आणि वैष्णवी काळे यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करावे आणि ‘जागतिक शांतता’ हा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यास हातभार लावावा, असे आवाहन लायन्स क्लब ऑफ संगमनेर सफायरच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# समर्थ शैक्षणिक संकुलात PHARMA AI-NOVA 2026 राष्ट्रीय परिषद उत्साहात

## कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक औषधनिर्मिती व संशोधनावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन; ३२५ विद्यार्थ्यांचा सहभाग

(समर्थ गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, लोकल ब्रँच आळेफाटा आणि नॅशनल फार्मसी वेल्फ अर असोसिएश न पुणे यांच्या सहकार्याने आयोजित 'PHARMA AI-NOVA 2026: Through Emerging Technologies' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी उत्साहात प्रारंभ झाला. या परिषदेत डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसीचे विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक अशा सुमारे ३२५ हून अधिक जणांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व फार्मसी क्षेत्राचे जनक डॉ. एम. एल. श्रॉफ यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी संस्थेचे सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सचिन कोतवाल,इंडियन फाम र्स्युटिकल असोसिएशन च्या आळेफाटा स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. डी. डी. गायकवाड आणि डॉ. सुरेश जाधव उपस्थित होते. विश्वस्त वल्लभ शेळके यांनी विद्यार्थ्यां नी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून संशोधनवृत्ती विकसित करावी आणि फार्मसी क्षेत्राच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले.कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक फार्मसीवर तज्ज्ञांचे म ार्गदर्शनपरिषदेच्या पहिल्या दिवशी डॉ.रेड्डीज लॅबोरेटरीज, मुंबईचे डॉ. मयूर संगवाई यांनी 'From Molecule to Patient: AI, Innovation and the Future of Pharma' या विषयावर मार्गदर्शन केले.

औषध संशोधनापासून रुग्णांपर्यंत औषध पोहोच विण्याच्या प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिम त्ता आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.भारती विद्यापीठाच्या पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे डॉ. एल. सथियानारायणन यांनी 'Role of AI in Pharmaceutical Education and Research' या विषयातून फार्मसी शिक्षण आणि संशोधनातील कृत्रिम बुद्धिम त्तेच्या उपयोगावर प्रकाश टाकला. एम आयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे डॉ. सतीश पोलशेट्टीवार यांनी 'Pharma 4.0 with AI: Reimagining the Future of Pharmaceutical Sciences' या विषयावर मार्गदर्शन करताना डिजिटल तंत्रज्ञानामुळे औषधनिर्मिती व संशोधन क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या संधी विशद केल्या.डॉ. उमेश बनकर यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व,संशोधनातील नवकल्प नांचे संरक्षण आणि फार्मसी क्षेत्रातील त्यांचा उपयोग याविषयी माहिती दिली. डॉ. व्ही.के.मौर्य यांनी औषध निर्मितीतील आधुनिक फॉर्म्युलेशन पद्धती, नावीन्य पूर्ण तंत्रज्ञान आणि औषधांची गुणवत्ता व परिणामकारकता वाढविण्यासाठी संशोधनाची भूमिका स्पष्ट केली. डॉ. पंकज दीक्षित यांनी 'Modern Medicine and Monoclonal Antibodies: Magic Bullet Indeed' या विषयावर मार्गदर्शन करताना मोनोक्लोनल अँटीबॉडीज, लक्षित उपचारपद्धती आणि विविध आजारांच्या उपचारांमधील त्यांचे महत्त्व अधोरेखित केले.पोस्टर सादरीकरण स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश राष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने आयोजित पोस्टर सादरीकरण स्पर्धेत डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसी आणि पीएच. डी. गटातील विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

डी. फार्मसी गट : प्रथम क्रमांक समृद्धी जाधव व नम्रता खंडारे (जे.बी.व्ही.पी. विद्यानिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, लाखेवाडी) यांनी मिळविला. द्वितीय क्रमांक अंकिता तोडकर व गायत्री मवाळे (समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे) यांनी, तर उत्तेजनार्थ पारितोषिक रिंकू चौधरी व श्रावणी पवार (आर.जे.एस.पी.एम. कॉलेज ऑफ फार्मसी, आळंदी) यांनी मिळविले.

बी. फार्मसी गट : ओम जगदळे व अश्विनी भोर (समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे) यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. भुशारा अस्लम मनियार व श्रद्धा विजय वाळके (लोकनेते अप्पासाहेब राजळे कॉलेज ऑफ फार्मसी, आदिनाथनगर) यांनी द्वितीय क्रमांक, तर वैष्णवी मोरे व तृप्ती चौधरी (समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे) यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

एम. फार्मसी गट : अतुल घोगरे (मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे) यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर नीलम इचके (समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे) यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला.

पीएच.डी. गट : हेमंत व्ही. ढाकणे (के. एम. कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई) यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना पाच हजार रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना तीन हजार रुपये, ट्रॉफी व प्रम ाणपत्र, तर उत्तेजनार्थ विजेत्यांना दोन हजार रुपये, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या नव्या संधींची ओळख या राष्ट्रीय परिषदेमुळे फार्मसी शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक




औषधनिर्मिती आणि संशोधन यांचा संगम साधला जात असून विद्यार्थ्यांना भविष्यातील तंत्रज्ञानाधारित संधींची ओळख होत आहे, असे समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत यांनी सांगितले. तज्ज्ञांची व्याख्याने, संशोधनविषयक चर्चा आणि पोस्टर सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची तसेच आपल्या संशोधनाला व्यासपीठ मिळविण्याची संधी उपलब्ध झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राची पडवळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत डॉ. मंगेश होले, डॉ. बिपिन गांधी, डॉ. सचिन दातखिळे, डॉ. राहुल लोखंडे, डॉ. शीतल गायकवाड, प्रा. नितीन महाले, प्रा. अजय भागवत आणि प्रा. अक्षय फुलसुंदर यांनी केले. समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके यांनी प्रास्ताविक केले, तर समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संतोष घुले यांनी आभार मानले.

# मागण्या मान्य होईपर्यंत भीमाशंकर कारखान्याचे गाळप बंद ठेवा केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेची भूमिका

मंचर (समर्थ गांवकरी)

केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या मागण्यांची पूर्तता होईपर्यंत दत्तात्रयनगर–पारगाव (ता.आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे ऊसतोड आणि गाळप बंद ठेवावे, तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या काटाबंद आंदोलनाला पाठिंबा द्यावा, अशी मागणी संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर यांनी केली आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने कारखान्याचे संस्थापक दिलीप वळसे पाटील यांना रविवार दि.१८ रोजी निवेदन दिले आहे.

पारगाव कारखाना स्थळावर स्वाभिमानी चे आंबेगाव तालुकाध्यक्ष तुकाराम गावडे आणि जुन्नर तालुकाध्यक्ष प्रमोद खांडगे यांनी कारखान्याचे संस्थापक दिलीप वळसे पाटील यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हंटले आहे की साखरेचा किमान विक्री दर प्रतिकिलो ३१ रुपयांवरून



५० रुपये करावा, इथेनॉलचा दर प्रतिलिटर ५८ रुपये ९५ पैशांवरून ७० रुपये करावा, तोडणी झालेल्या उसाला प्रतिटन पाच हजार रुपये भाव द्यावा, अशा प्रमुख मागण्या संघटनेने केल्या आहेत. याशिवाय हंगामाच्या सुरुवातीला गाळप केल्यामुळे साखर उताऱ्यात होणारी घट आणि उसाचे वजन कमी झाल्याने शेतकऱ्यांना सहन कराव्या लागणाऱ्या नुकसानीची भरपाई म्हणून ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी राज्यभर आंदोलन सुरू असून, विविध साखर कारखान्यांनी आंदोलनाला पाठिंबा दिल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या आर्थिक हितासाठी भीमाशंकर कारखान्यानेही गाळप थांबवून आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केले आहे. दरम्यान, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे निवेदन प्राप्त झाले असून, याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे कारखान्याचे संस्थापक माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी स्पष्ट केले.

# वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रि या (गरजूंना ५०० चष्म्यांचे वाटप)

जुन्नर (समर्थ गांवकरी)

डिसेंट फाउंडेशन,शंकरा आय हॉस्पिटल,माऊली आय केअर सेंटर जुन्नर व श्री हॉस्पिटल आळेफाटा यांचा संयुक्त उपक्रम;'एकही गरजू अंधारात राहू नये' हा संकल्प

सामाजिक बांधिलकी जपत समाजातील गरजू व वंचित घटकांना आरोग्यसेवाउपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृषि भूषण जितेंद्र चंद्रकांत बिडवई यांच्या वाढदिवसानिमित्त डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या पुढाकारातून जुन्नर तालुक्यात मोफत नेत्र तपासणी, मोती बिंदू शस्त्रक्रिया, चष्मे वाटप व आरोग्य तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. डिसेंट फाउंडेशन,पुणे,शंकरा आय हॉस्पिटल,पनवेल (मुंबई), माऊली आय केअर सेंटर, जुन्नर व श्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर नेत्रतपास णी आणि उपचार मिळावेत, आर्थिक अडचणींमुळे कोणालाही उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, या भावनेतून या अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या वेळापत्रकानुसार १५ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, मढ; १८ ऑक्टोबर रोजी ग्रामीण रुग्णालय,ओतूर; १९ ऑक्टो बर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, आळे;२६ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, सावरगाव; तसेच ३० ऑक्टो बर रोजी ह.भ.प. गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रम, जुन्नर येथे शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरां मध्ये नागरिकांची मोफत नेत्रतपासणी करून मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांची निवड केली जात आहे.निवड झालेल्या गरजू रुग्णांवर शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.तसेच प्रवास, निवास,नास्ता,जेवण,ऑपरेशन ,एक महिन्याची औषधे व चष्मे देखील दिले जातात . तसेच गरजू रुग्णांना ५०० चष्म्यांचे मोफत वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी रेशनकार्ड व आधारकार्डच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. रक्तदाब, मधुमेह किंवा इतर नियमित औषधे सुरू असल्यास तीही सोबत आणावीत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून यापूर्वीही गरजू नागरिकांसाठी आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. वाढदिवस केवळ वैयक्तिक आनंदापुरता मर्यादित न ठेवतासमाजासाठी उपयुक्त ठरावा, या भावनेतून कृषिभूषण जितेंद्र बिडवई यांनी आरोग्यसेवेचा हा संकल्प केला आहे.

तसेच १००० महिलांची आस्था ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी व जनजागृती अभियान देखील राबविले आहे . ग्रामीण भागातील दहा शाळामधील विद्यार्थ्यांची दंत तज्ञामार्फत मोफत दंत तपासणी करून ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना टूथपेस्ट व टूथब्रश वाटप करण्यात आले .कळी उमलताना या उपक्रमातर्गत १००० पेक्षा जास्त किशोरवायीन मुलींना मानसिक आरोग्य शारीरिक आरोग्य वैयक्तिक स्वच्छता मासिक पाळीत घ्यायची काळजी चांगला वाईट स्पर्श व स्वसंरक्षण याबाबत म ार्गदर्शन व मोफत पर्यावरण पूरक सॅनिटरी पॅड मार्गदर्शक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.पन्नास ज्येष्ठाना आधार काठ्यांचे वाटपही करण्यात येणार आहे.

आज ओतूर येथील कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा



परिषद सदस्या छाया ताई तांबे,माजी जिल्हा परिषद सदस्य मोहित ढमाले, माजी सरपंच ह.भ.प.गंगाराम महाराज डुंबरे,डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई,सचिव डॉ.एफ.बी. आतार ,वैद्यकीय अधिकारी प्रशांत गोरे,डॉ वैष्णवी टीके कर शंकरा आय हॉस्पिटल चे प्रकाश पाटील आणि टीम , माऊली आय केअर सेंटर चे विलास बोन्द्रे, श्री हॉस्पिटल आळेफाटाचे डॉ धनश्री जाधव,संतोष तांबे,ज्येष्ठ नागरिक संघांचे अध्यक्ष रा.ज्ञा.डुंबरे,सचिव बाबाजी डुंबरे,आत्माराम खराडे , एकनाथ डुंबरे,बबन डुंबरे, कांचन थोरात ,भिवाजी माळवे ,अशोक सहाणे, शांताराम पानसरे, बाळा साहेब हडवळे, सुदाम ढमाले वसंत डुंबरे,देविदास तांबे , महादेव ओतूरकर,शिरीष डुंबरे,प्रमोद ढमाले,श्रावण घोगरेअनुराधा डोके ,

# श्रीगोंदा कन्या विद्यालयाच्या कुस्तीपटूंची राज्यस्तरावर सुवर्णभरारी!

**तेजस्विनी गिरमकरची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड; श्रावणी सोलनकरला रौप्यपदक, तर थाय किक बॉक्सिंगमध्ये वैष्णवी भागवत व शर्वरी टकले यांना सुवर्ण टायटल बेल्ट**

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथील विद्यार्थिनींनी शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धे त घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने ३० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. श्रावणी सोलनकर हिने ३९ किलो वजन गटात रौप्यपदक मिळविले. याशिवाय, गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत विद्यालयाच्या वैष्णवी भागवत व शर्वरी टकले यांनी सुवर्ण टायटल बेल्ट मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ म धील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली येथील कारमेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या शैक्षणिक संकुलात पार पडलेल्या या स्पर्धे त श्रीगोंदा कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपल्या कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय यश मिळविले.

१४ वर्षांखालील वयोगटातील तेजस्विनी गिरम कर हिने ३० किलो वजन गटात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या कामगिरीमुळे तिची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याच स्पर्धेत श्रावणी सोलनकर हिने ३९ किलो वजन गटात रौप्यपदक मिळवत आपल्या खेळाची चमक दाखविली.

दरम्यान, विद्यालयाच्या वैष्णवी भागवत आणि शर्वरी टकले यांनी गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय थाय किक बॉक्सिंग स्पर्धे त सुवर्ण टायटल बेल्ट पटकावून क्रीडा क्षेत्रातील आपली गुणवत्ता सिद्ध केली. कुस्ती आणि थाय किक बॉक्सिंग या दोन्ही क्रीडाप्रकारांत विद्यार्थिनींनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला नवी उंची प्राप्त झाली आहे.

गुणवंत विद्यार्थिनींचा सन्म ान

विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गुणवंत खेळाडू, त्यांचे पालक आणि मार्गदर्शकांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान



करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य कुंडलिकराव दरेकर, गणेश भोस, स्कूल कमिटीच्या रत्नप्रभा बोरुडे आणि पीटर रणसिंग यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

या यशामागे विद्यालयाचे क्रीडा विभागप्रमुख किरण कोकणी, बुद्धभूषण साळवे, कुस्तीचे प्रशिक्षक मेजर फंड आणि थाय किक बॉक्सिंगचे ग्रँडमास्टर समीर पांढरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशाबद्दल विद्यालयासह श्रीगोंदा परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. तेजस्विनी गिरमकर हिच्या राष्ट्रीय स्पर्धेतील निवडीमुळे तिच्याकडून पुढील स्पर्धेतही उत्तम कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.



**अहिल्यानगर (स.गांवकरी):– रंग हिरवा–श्री तुळजाभवानी भवानी माता महिला ग्रुप गणेशनगर, कल्याण रोड,अहिल्यानगर.**



**अहिल्यानगर (स.गांवकरी):– रंग हिरवा–बाई इचरजबाई फिरोदिया प्रशाला प्राथमिक व पूर्व प्राथमिक वर्ग नवी पेठ येथील शिक्षक वृंद.**